महाराष्ट्र शासन
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग
मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक रोड - 422101
दुरध्वनी क्र. : 0253-2461439 Email : dycomplan.nashik@maharashtra.gov.in
विभागाचे नाव : नियोजन शाखा संकलन : कुंभमेळा

प्रति,

मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिक.

विषय:- मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय, मुंबई येथे नाशिक- त्र्यंबकेश्वर कुंभमेळा 2027 च्या पुर्वतयारीबाबत दिनांक 31 डिसेंबर, 2024 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन नाशिक शहर व परिसराच्या विकासासाठी विशषत: पर्यटन क्षेत्रात करावयाच्या विकासाकरिता नमूद प्रकल्पांबाबत मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 31 डिसेंबर, 2024 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त या कार्यालयास प्राप्त झाले असून ते माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तव सादर करण्यात येत आहे. हि विनंती.

आपला विश्वासू,
**Signed by Yogendra Ashok Chaudhari**
**Date: 21-01-2025 11:05:57**

(योगेंद्र चौधरी)
उपआयुक्त (नियोजन)
नाशिक विभाग, नाशिक

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
४ था मजला, (मुख्य इमारत), मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय मुंबई-४०० ०३२
Email ID : **ud२५.urban-mh@mah.gov.in**

---

क्र. नामपा-२०२४/प्र.क्र. २१०/नवि-२५ दिनांक : १७ जानेवारी, २०२५

**प्रति,**

१) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
३) अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
४) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
५) अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव, वाहतूक व बंदरे, मंत्रालय, मुंबई
७) प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव, (पर्यटन), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
९) प्रधान सचिव, जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव, उर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन (महा मेट्रो) (नागपूर/पुणे)
१५) विभागीय आयुक्त, नाशिक
१६) जिल्हाधिकारी, नाशिक
१७) आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक
१८) मुख्याधिकारी, त्र्यंबक नगरपरिषद, त्र्यंबक.
१९) उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (MSRTC)
२०) उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC)
२१) प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI), मुंबई
२२) महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई

**विषय :- नाशिक शहर आणि परिसराच्या सर्वांगिण विकासासाठी उपस्थित मुद्यांबाबत मा.मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३१.१२.२०२४ रोजी आयोजित बैठकीचे इतिवृत्त.**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन नाशिक शहर आणि परिसराच्या विकासासाठी विशेषत: पर्यटन क्षेत्रात करावयाच्या विकासाकरिता नमूद प्रकल्पांबाबत मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक ३१.१२.२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता मा.मुख्य सचिव, यांचे दालन, ६ वा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई-३२ येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

**आपला,**

सोबत : वरीलप्रमाणे.

17/01/2025

**(मो.क. बागवान)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत : माहितीस्तव अग्रेषित -**

१) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.

२)प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.

3)उप सचिव (नवि-२५), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.

**दिनांक ३१/१२/२०२४ रोजी सकाळी ११.३० वा. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक परिसरातील सिंहस्थ कुंभमेळा २०२७, गोदावरी नदी संवर्धन, प्रमुख विकास कामे व इतर अनुषंगिक विषयांबाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त**

---

सदर बैठकीला उपस्थित मान्यवरांची यादी सोबत जोडली आहे.

०२. बैठकी दरम्यान डॉ. प्रवीण गेडाम, विभागीय आयुक्त, नाशिक यांनी सादरीकरण करुन नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या आत्तापर्यंत केलेल्या वाहतूक व्यवस्था व गर्दीचे नियंत्रण, साधुग्राम, गोदावरी नदी, उपनद्या यांचे संवर्धन शुध्दीकरण, सुशोभीकरण तसेच सांस्कृतिक परिसराचा विकास, कुंभमेळयासाठी इतर पायाभूत सुविधा आणि त्याचप्रमाणे इतर अनुषंगिक विकास कामे इत्यादी बाबत सादरीकरण केले. तसेच नाशिक शहरातील वाहतूक व्यवस्थेशी संबंधित बसस्थानके, रेल्वे स्थानके यांचा पुर्नविकास व परिसरातील मोठे महामार्ग या बद्दलचीही चर्चा झाली. त्याचप्रमाणे श्रीमती मनिषा खत्री, आयुक्त नाशिक महानगरपालिका यांनी नमामि गोदा बद्दल सादरीकरण केले.

बैठकीमध्ये मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य यांनी पुढीलप्रमाणे निर्देशित केले.

| अ.क्र | | बैठकीत दिलेले निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|---|
| **अ. सर्वसाधारण सुचना** | १ | प्रयागराज येथे सध्या सुरु असलेल्या कुंभमेळयाला नाशिक कुंभमेळयाशी संबंधित प्रमुख अधिका-यांनी भेट देवून तेथील सोयी सुविधांची पाहणी करावी. | १.नगर विकास विभाग (नवि-२)<br>२.विभागीय आयुक्त, नाशिक<br>३.आयुक्त,नाशिक महानगरपालिका<br>४.मुख्याधिकारी,त्र्यंबकेश्वर नगरपालिका |
| | २ | कुंभमेळयासाठी आराखडा प्रस्तावित करताना त्या त्या विभागाच्या मागणीनुसार कामे घ्यावयाचे नसून कुंभमेळयासाठी थेट आवश्यक असणा-या कामांचा आराखडा प्रस्तावित करण्यात यावा. | १.नगर विकास विभाग (नवि-२)<br>२.विभागीय आयुक्त, नाशिक<br>३.आयुक्त,नाशिक महानगरपालिका<br>४.मुख्याधिकारी,त्र्यंबकेश्वर नगरपालिका |
| **ब. गोदावरी नदी, नजिकचा धार्मिक/ सांस्कृतिक परिसर व अनुषंगिक विषय** | १ | त्र्यंबकेश्वर आणि नाशिक येथील गोदावरी नदी आणि इतर उपनद्या यांच्यामध्ये वाहून येणारे मलजल याचा अभ्यास करताना दोन्ही शहरातील संपूर्ण मलजल वहन आणि ट्रीटमेंट (एसटीपी) याचा अभ्यास करुन त्यातील अंतर (gaps) निश्चित करुन याबाबतचा विविध योजनांमधून ही कामे कशी पूर्ण करता येईल याचे नियोजन करावे. | १.नगर विकास विभाग (नवि-२)<br>२.विभागीय आयुक्त, नाशिक<br>३.आयुक्त,नाशिक महानगरपालिका<br>४.मुख्याधिकारी,त्र्यंबकेश्वर नगरपालिका |
| | २ | नदीकाठाच्या सुशोभिकरण (River front development) करण्याकरिता शहरी नियोजन आणि अर्बन डिझायनिंगमध्ये उत्कृष्ट कार्यक्षमता असणा-या यंत्रणा निवडण्याच्या दृष्टिने पावले उचलावित, याबाबत चर्चा करताना पुणे शहरात करण्यात आलेल्या नदीकाठच्या विकासाचे उदाहरण | १.नगर विकास विभाग (नवि-२)<br>२.विभागीय आयुक्त, नाशिक<br>३.आयुक्त,नाशिक महानगरपालिका<br>४.मुख्याधिकारी,त्र्यंबकेश्वर नगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| | | देण्यात आले. त्याचप्रमाणे नागपूर येथील विशिष्ट प्रकारच्या विकासाबद्दल मा. न्यायालयांने स्थगिती आदेश दिल्याचेही निदर्शनास आणण्यात आले. त्याचप्रमाणे देशातील व जगातील best practices चा विचार करण्यात यावा. | |
| | ३ | नाशिक शहरातील रामकुंड, काळाराम मंदिर या परिसरातील या धार्मिक व सांस्कृतिक स्वरुपाच्या परिसराच्या विकासाचा आराखडा तयार करीत असतानाच नाशिक शहरातील इतर महत्वाच्या निगडीत जागा आणि त्याचप्रमाणे त्र्यंबकेश्वर शहरातील धार्मिक आणि सांस्कृतिक महत्व असलेल्या जागा या सर्वांचाएकत्रित आराखडा तयार करण्यात यावा. यासाठी अयोध्या, वाराणसी यासारखी उदाहरणे देण्यात आली. तसेच या कामासाठी अर्बन डिझाइनमध्ये कौशल्य (excellence) असणाऱ्या संस्था शोधून त्यांचेपण inputs घेण्यात यावे. | १.नगर विकास विभाग (नवि-२)<br>२.विभागीय आयुक्त, नाशिक<br>३.आयुक्त,नाशिक महानगरपालिका<br>४.मुख्याधिकारी,त्र्यंबकेश्वर नगरपालिका |
| | ४ | त्र्यंबकेश्वर शहर, त्र्यंबकेश्वर ते नाशिक आणि नाशिक शहर या पट्ट्यातील गोदावरी नदीच्या दोन्ही बाजूने नो डेव्हलपमेंट झोन आणि / किंवा सायकल ट्रैक, वॉकीग ट्रॅक, सांस्कृक्तिक कार्यक्रमासाठी जागा व इतर प्रकारच्या पब्लिक स्पेसेस तयार करण्यात याव्यात. यासाठी आवश्यकतेनुसार आरक्षण टाकून टीडीआर किंवा कायदेशीर प्रक्रीयेद्वारे या जागा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था अथवा विकास प्राधिकरणाने संपादित करुन त्यांचा विकास करण्यात यावा. | १.नगर विकास विभाग (नवि-१)<br>२.आयुक्त,नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण<br>३.आयुक्त,नाशिक महानगरपालिका<br>४.मुख्याधिकारी,त्र्यंबकेश्वर नगरपालिका |
| | ५ | या भागात आणि शहरात इतरत्र हरित पट्टे (उदा. मियावाकी फॉरेस्ट) करण्याच्या दृष्टिने कार्यवाही करावी. | १.नगर विकास विभाग (नवि-२)<br>२.विभागीय आयुक्त, नाशिक<br>३.आयुक्त,नाशिक महानगरपालिका |
| | ६ | नाशिक- त्र्यंबकेश्वर येथे अनेक मंदिर संस्थाने आहेत. त्यांनीही विकास प्रक्रीयेत सहभागी होऊन संबंधित शासकीय विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याशी समन्वय साधून संस्थानच्या निधीसह उपलब्ध सर्व स्त्रोतातील / योजनांतील निधीचा सुयोग्य वापर करण्यासाठी नियोजन आणि अंमलबजावणी करावी. | १.विधी व न्याय विभाग<br>२.विभागीय आयुक्त, नाशिक<br>३.आयुक्त,नाशिक महानगरपालिका<br>४.मुख्याधिकारी,त्र्यंबकेश्वर नगरपालिका |
| | ७ | गोदावरी नदी आणि धार्मिक व सांस्कृतिक परिसर नमूद वरील सर्व बाबीं बाबत विभाग स्तरावर विभागीय आयुक्त यांच्याकडून आढावा घेण्यात येतोच तथापि यापेक्षाही वरिष्ठ स्तरावर एक समिती नेमून त्यांचा वेळोवेळी आढावा घ्यावा. | नगर विकास विभाग (नवि-२) |

| | | | |
|---|---|---|---|
| **क. साधुग्राम व अनुषंगिक विषय** | १ | सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पुर्वतयारीसाठी विभागीय आयुक्त नाशिक यांनी नियमितपणे प्रत्येक आठवडयाला सर्व विभागांची आढावा बैठक घ्यावी. | विभागीय आयुक्त, नाशिक |
| | २ | नाशिक येथील साधुग्रामसाठी भूसंपादन करताना सदर कुंभमेळयाची पार्श्वभूमी पाहता सदर जागांशी संबंधित जुने अभिलेख तपासावे आणि मुलतः जागा कुणाची होती याबद्दलचा शोध घ्यावा. यानंतरच आवश्यकतेनुसार भूसंपादनाच्या विषयावरती प्रस्ताव दाखल करावा. | १.विभागीय आयुक्त, नाशिक<br>२.जिल्हाधिकारी ,नाशिक |
| | ३ | नाशिक महानगरपालिकेला महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना नोटीसांची माहिती संकलित करुन त्यातील कोणत्या प्रकरणात भूसंपादन करणे आवश्यक आहे याचा सारासार विचार करुन जाणिवपूर्वक निर्णय घ्यावा व निधी कमतरता असल्यास तशी पूर्णतः खात्री करुन नंतरच कमी महत्वाची तुलनेने सार्वजनिक हिताच्यादृष्टिने कमी महत्वाची असलेली आरक्षणे व्यपगत होण्यास हरकत नाही. | १.नगर विकास विभाग (नवि-१)<br>२.विभागीय आयुक्त,नाशिक<br>३.जिल्हाधिकारी,नाशिक<br>४.आयुक्त,नाशिक महानगरपालिका |
| **ड. दळणवळण, वाहतूक, इ. सबंधित चर्चा.** | १ | नाशिक रोड रेल्वे स्थानकाचे पुनर्विकास रेल्वेकडून प्रस्तावित आहे. या रेल्वे स्टेशन जवळच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ आणि नाशिक महानगरपालिका यांच्या जागा आहेत. त्यामुळे या (२) रेल्वे स्टेशनचा पुनर्विकास होत असताना रेल्वे, शहर बस स्थानक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ बसस्थानक त्याचप्रमाणे प्रस्तावित असलेल्या नाशिक मेट्रोचे स्थानक व इतर प्रस्तावित प्रकल्प अशा सर्वांचा एकत्रित विचार करुन मल्टी मोडेल स्थानकाचे नियोजन करावे. गरजेनुसार याला ट्रान्सीट ओरियंटेड डेव्हलपमेंटच्या तत्वानुसार अतिरिक्त एफएसआय देखील देता येईल. | १.नगर विकास विभाग (नवि-१)<br>२.नगर विकास विभाग (नवि-२)<br>३.गृह (परिवहन) विभाग,मंत्रालय<br>४. महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई |
| | २ | नाशिक शहरात अनेक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवनहन मंडळाची बसस्थानके आहेत याबाबतही उपलब्ध असलेल्या मोठ्या जागांचा विचार करुन एक मध्यवर्ती बसस्थानक करण्याचा प्रस्ताव तयार करावा. | गृह (परिवहन) विभाग,मंत्रालय |
| | ३ | नाशिक शहरात मेट्रोचे आत्तापर्यंत निओ मेट्रो, मोनोरेल आणि दोन कोचची मेट्रो असे विविध पर्याय समोर आले आहेत. त्याचा उचित अभ्यास करुन योग्य तो प्रस्ताव सादर करावा. | १.नगर विकास विभाग (नवि-१)<br>२.विभागीय आयुक्त,नाशिक<br>३.जिल्हाधिकारी,नाशिक<br>४.आयुक्त,नाशिक महानगरपालिका |
| | ४ | प्रत्येक विभागामध्ये विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली त्या त्या भागातील वाहतूक, दळणवळण, लॉजिस्टीक, अर्बन प्लॅनिंग (नगर रचना), वगैरे याबाबत सुसूत्रता राहणे, दीर्घ स्वरुपी | १.नियोजन विभाग,मंत्रालय<br>२.विभागीय आयुक्त,नाशिक |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नियोजन करणे आणि आवश्यकतेनुसार प्रकल्पांची निश्चिती करणे याकरिता विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली सर्व विभागांमध्ये समिती नेमण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक यांनी अपर मुख्य सचिव (नियोजन) यांच्याकडे उचित कार्यवाहीसाठी पाठवावा. | |
| | ५ | मुंबई महानगर क्षेत्रासाठीच्या एकंदरित आर्थिक विकासासाठी बृहत आराखडा तयार करण्यात आला आहे. त्याच धर्तीवर नाशिक महानगर क्षेत्रासाठी तशा पध्दतीचा बृहत आराखडा तयार करावा. | नियोजन विभाग,मंत्रालय |

वरीलप्रमाणे सर्व संबंधित विभागाने कार्यवाही करावी आणि क्षेत्रीय पातळीवर विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, आयुक्त, नाशिक महानगरपालिका तसेच इतर क्षेत्रीय यंत्रणा जसे की उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ आणि व्यवस्थापकीय संचालक, महा मेट्रो यांनी वरील प्रमाणे कार्यवाही करावी. असे निर्देश मा. मुख्य सचिव यांनी दिलेत.

वरील प्रमाणे चर्चा होऊन व निर्णय होऊन बैठक समाप्त झाली

****************************************************